पुढारी

शुक्रवार, २० डिसेंबर २०२४

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थिनी साहसी उपक्रमात सहभागी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थिनीं व स्टाफसाठी निसर्गाच्या सान्निध्यातील साहसी ट्रेकचे पळसंबे, रामलिंग, गगनबावडा येथे आयोजन करण्यात आले होते. यात ३० छात्र विद्यार्थिनी व स्टाफ सहभागी झाले. राजेश गणपुले, मेजर सुनीता भोसले, डॉ. एस.एस.लठ्ठे, डॉ. सोमनाथ काळे, डॉ. कैलास पाटील, डॉ. एस. एस. अंकुशराव यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ . आर. आर. कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले. डॉ. श्रुती जोशी, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, रघुनाथ जोग यांचे सहकार्य लाभले.

लोकमत
शुक्रवार २०.१२.२०२४

# ट्रेन द ट्रेनर्स शिबिर उत्साहात

कोल्हापूर : स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये चेस असोसिएशन कोल्हापूरने आयोजित केलेला ट्रेन द ट्रेनर्स शिबिर उत्साहात झाले. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना शाळेत बुद्धिबळ हा उपक्रम येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू होत आहे. त्यासाठी आठ जिल्ह्यात शिबिर होत आहे. पैकी विवेकानंद कॉलेजमध्ये शिबिर घेतले. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे उपाध्यक्ष गिरीश चितळे, डॉ. शरद बनसोडे, सिद्धांत शिंदे, कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते बुद्धिबळाच्या चुंबकीय प्रदर्शन पटावर चाल करून कार्यशाळेचे उद्घाटन झाले. डॉ. विकास जाधव, संतोष कुंडले, भरत चौगुले, मनीष मारुलकर, उत्कर्ष लोमटे, उपाध्यक्ष धीरज वैद्य, राष्ट्रीय पंच आरती मोदी उपस्थित होते.